**एफ.डी. क्र. १/२०१८**
**सीएनआर.क्र.एमएचएएच-०८-०००३६५-२०१८**
**निशाणी क्र. २३**

## निशाणी क्र. २३ वर आदेश

वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटपासाठी, जाहीर ठराव व मनाई आदेशासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'कैफियत नाही' चा आदेश रद्द व्हावा, यासाठी केलेला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ व वादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, कैफियत देण्यासाठी जुन्या प्रकरणांच्या नकला व आवश्यक ती माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ हे सदर दाव्यात वेळेत कैफियत दाखल करु शकले नाहीत. प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी जाणुन बुजून कैफियत दाखल करण्यास उशीर केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ विरुध्द दाव्यात झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांचे कधीही व कशानेही भरुन न येणारे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर व्हावा.

३. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले. वादींच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी कैफियत दाखल करण्यात जाणीवपुर्वक व हलगर्जीपणाने उशीर केलेला आहे. सदर उशीर का झाला, याचे प्रतिवादींनी दिलेले स्पष्टीकरण जुजबी व खोटे आहे. प्रतिवादींना त्यांनी केलेला निष्काळजीपणे व हलगर्जीपणा यांचा गैरफायदा घेता येणार नाही. कैफीयत देण्यास उशीर झाल्याचे कारण खरे व बरोबर नाही. सबब, अर्ज रद्द व्हावा.

४. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता, प्रत्येक अर्जात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्याची योग्य बाजु मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे वादी यास त्याची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश,

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी वादीला पुढील तारखेस अगर तत्पुर्वी रु. ४००/- देण्याच्या अटीवर दाव्यातील ''कैफियत नाही'' हा आदेश रद्द करण्यात येतो.

दिनांक : १४/०२/२०१९.
ठिकाण-संगमनेर.

(प्रसाद दि. कोळेकर)
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर
संगमनेर.